मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल


बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# शहरात महायुती कार्यकर्त्यांचा मोठा जल्लोष

## चौका-चौकात आतषबाजी, फुलांची मुक्त उधळण : मुख्य चौक आणि विजेत्या उमेदवारांच्या घरासमोर आनंदोत्सव

**पिंपरी | प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीचा कल लक्षात आल्यानंतर महायुती उमेदवारांच्या कार्यकर्त्यांनी दुपारी बारा वाजल्यापासूनच जल्लोष सुरू केला तो रात्री उशिरापर्यंत सुरूच होता. शहरातील महायुतीचे तिन्ही उमेदवार विजयी झाल्यानंतर चौका-चौकात आतषबाजी केली. फुलाची, गुलाल आणि भंडाऱ्याची उधळण करत जल्लोष केला. महायुतीमधील राष्ट्रवादी (अजित पवार गट) या गटाने पिंपरीत आनंदोत्सव साजरा करत सुरुवात केली. त्यानंतर भोसरी आणि नवी सांगवीमध्ये देखील मोठ्या प्रमाणात कार्यकर्ते रस्त्यावर एकत्र आले होते. सायंकाळी उशिरापर्यंत मिरवणूक, डिजे लावून आपल्या उमेदवाराचा विजय उत्सव साजरा होत होता.



### विजयी उमेदवारांनी घेतले मोरया गोसावींचे दर्शन

» चिंचवड येथील उमेदवार शंकर जगताप यांनी निकाल लागल्यानंतर चिंचवड येथील श्री मोरया गोसावी मंदिरात जाऊन दर्शन घेतले. चिंचवड परिसरातील नागरिकांनी मोठ्या प्रमाणात साथ दिली. त्यामुळे कार्यकर्त्यांना भेटण्यासाठी तसेच, मंदिरात दर्शन घेऊन ते पुढे मार्गस्थ झाले. यावेळी चिंचवड परिसरातील भाजप, राष्ट्रवादी या कार्यकर्त्यांनी फटाके फोडून तसेच भंडारा उधळून त्यांचे स्वागत केले.

शहरातील चिंचवड आणि भोसरी या दोन मतदारसंघात भाजपने उमेदवार दिला होता तर, पिंपरी या राखीव मतदारसंघात अजित पवार गटाचे उमेदवार आपले नशीब आजमावत होते. दरम्यान, शहरातील या तिन्ही ठिकाणी महायुतीचे उमेदवार मोठ्या फरकाने विजयी झाले आहेत. सकाळी आठ वाजता प्रत्यक्ष मतदानाला सुरुवात झाल्यानंतर नेमका कल कुठे लागेल याची शाश्वती नसल्याने शहरातील सर्वच पक्ष कार्यालयामध्ये शुकशुकाट होता. या ठिकाणी केवळ पोलीस बंदोबस्तासाठी तैनात असल्याचे दिसून आले. त्याचप्रमाणे महाविकास आघाडीचे उमेदवारांच्या घरासमोर देखील कार्यकर्ते नव्हते. पिंपरीतील सुलक्षणा धर शीलवंत यांच्या घरासमोर मोजके कार्यकर्ते होते. कार्यकर्त्यांसाठी पाण्याच्या बाटल्या तसेच, जेवणाचे पाकिट मागवण्यात आले होते. त्याचप्रमाणे चिंचवड येथील राहुल कलाटे यांच्या घरासमोर देखील शुकशुकाट होता.

### कही खुशी कभी गम

» शहरातील महायुतीच्या उमेदवारचे घर, कार्यालय एवढेच नव्हे तर, त्या परिसरात असलेल्या सार्वजनिक मंडळांनी देखील मोठ्या प्रमाणात आनंद उत्सव साजरा केला. मात्र, दुसरीकडे महाविकास उमेदवारांच्या घराजवळ कमालीची शांतता दिसून आली. सकाळी अगदी थोडा प्रमाणात असलेली कार्यकर्ते देखील दुपारनंतर निघून गेले. तर, त्यांच्या कार्यालयाजवळ देखील कोणीही फिरकले नाही. दुसरीकडे, भोसरी येथील महाविकास आघाडीचे उमेदवार अजित गव्हाणे यांच्या

# पिंपरीत अण्णा बनसोडे तिसऱ्यांदा आमदार

## राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षाचे आमदार अण्णा बनसोडे हे तिसऱ्यांदा या मतदारसंघातून आमदार झाले आहेत.

**पिंपरी | प्रतिनिधी**

शहरातील राखीव असलेल्या पिंपरी विधानसभा मतदारसंघातून राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षाचे आमदार अण्णा बनसोडे हे तिसऱ्यांदा या मतदारसंघातून आमदार झाले आहेत. पहिल्या फेरीपासून आघाडीवर असलेल्या बनसोडे यांनी अखेर राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षाच्या डॉ. सुलक्षणा शिलवंत यांचा ३६ हजार ६९८ मतांनी पराभव केला.

चिंचवड आणि भोसरी या दोन मतदारसंघांमध्ये महायुतीच्या जवळपास सर्वच बड्या नेत्यांनी हजेरी लावली होती. मात्र, पिंपरी मतदारसंघात एकाही नेत्याची सभा अथवा रोड शो (रॅली) झाली नाही. स्वतः अण्णा बनसोडे यांनी माझ्याकडे सभा अथवा रॅली नको, मी एकतर्फी विजय मिळवून दाखवतो,असे महायुतीच्या सर्व नेत्यांना सांगितले होते. दुसरीकडे महायुतीचे नेते



येत नसल्याने महाविकास आघाडीच्या नेत्यांनी देखील या मतदारसंघाकडे पाठ फिरवल्याचे दिसून आले. याचा फटका शिलवंत यांना बसला. तर बनसोडे यांनी शांततेत स्वतःची पारंपारिक यंत्रणा राबवून विजय मिळवला.

बालेवाडी येथील श्री शिवछत्रपती क्रीडा संकुलामध्ये सकाळी आठ वाजल्यापासून पिंपरी विधानसभेच्या मतमोजणीला सुरूवात झाली. पहिल्या फेरीपासूनची घेतलेली आघाडी बनसोडे यांनी शेवटपर्यंत कायम ठेवली. पहिल्या फेरीत बनसोडे यांनी ४ हजार २८८ मतांची आघाडी घेतली. नंतर चौथ्या फेरीत त्यांनी १२ हजार ४१७ मतांची आघाडी घेतली. २० व्या फेरीअखेर ही आघाडी वाढत जात बनसोडे यांनी १ लाख ८ हजार ९४९ इतकी मते घेतली. तर, ३६ हजार ६९८ मतांनी विजयी होत त्यांनी हॅट्रिक केली. त्यांच्या प्रतिस्पर्धी राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षाच्या सुलक्षणा शिलवंत यांचा पराभव केला. त्यांना ६१ हजार २५१ मतावर समाधान मानावे लागले. जुन्या पुणे-मुंबई महामार्गाच्या दोन्ही बाजूच्या परिसराचा समावेश असलेला पिंपरी विधानसभा मतदारसंघ संमिश्र लोकवस्तीचा आहे. अनुसूचित जाती (एससी) साठी राखीव असलेल्या या मतदारसंघाची २००९ मध्ये निर्मिती झाली. तेव्हापासून झालेल्या तीन निवडणुकांमध्ये दोनदा राष्ट्रवादी आणि एकदा शिवसेनेने बाजी मारली. २००९ आणि २०१९ मध्ये अण्णा बनसोडे तर २०१४ मध्ये शिवसेनेचे ॲड. गौतम चाबुकस्वार निवडून आले.

> “ महायुती सरकारने सामान्य जनतेला केंद्रबिंदू मानून जनतेच्या हिताची कामे केली. सरकारच्या योजना जनतेच्या हिताच्या असल्याने राज्यात जनतेनं महायुतीला कौल दिलेला आहे. पिंपरी विधानसभेतील जनतेचा माझ्यावर विश्वास असून माझा विजय एकतर्फी झालेला आहे. काही सहकाऱ्यांचा विरोध ही बाब केवळ पक्षातील अंतर्गत स्पर्धा होती. नंतरच्या काळात सर्वांनी एकदिलाने काम केले. पुढील काळात केंद्र, राज्य शासन आणि पिंपरी-चिंचवड महापालिका या तीनही स्तरावरून शहराचा विकास साधण्याचे ध्येय आहे..
>
> - अण्णा बनसोडे, विजयी उमेदवार, पिंपरी विधानसभा मतदारसंघ

# पुणे जिल्ह्याचे कारभारी अजित पवारच!

## राजकीय भवितव्य पणाला लागलेले उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुणे जिल्ह्यात आठ जागा जिंकून आपणच जिल्ह्याचा कारभारी असल्याचे दाखवून दिले

**पुणे | प्रतिनिधी**

राजकीय भवितव्य पणाला लागलेले उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुणे जिल्ह्यात आठ जागा जिंकून आपणच जिल्ह्याचा कारभारी असल्याचे दाखवून दिले आहे. अनेकदा रागात बोलणारे, 'बघून घेतो' अशी जाहीरपणे दमबाजी करणारे, एखादा शब्द चुकीचा वापरून वादात सापडणारे अजित पवार यांनी भाजपच्या संगतीत आल्यानंतर यंदाच्या निवडणुकीत जिल्ह्यात प्रचार करताना प्रचारशैलीत कमालीचा बदल केला होता. कोणतेही वादग्रस्त विधान न करता आणि वैयक्तिक टीका-टिप्पणी टाळून 'विकास' या मुद्द्यावर केलेल्या प्रचारामुळे मतदारांनी त्यांना साथ दिल्याचे निकालावरून स्पष्ट झाले आहे.

जिल्ह्यात राष्ट्रवादी (अजित पवार) आणि राष्ट्रवादी (शरद पवार) या दोन पक्षांच्या वर्चस्वाचा प्रश्न होता. त्यात अजित पवार यांचे राजकीय भवितव्य या निवडणुकीच्या निकालानंतर ठरणार होते. त्यामुळे अजित पवार यांनी या वेळच्या निवडणुकीत नियोजनबद्ध प्रचार केल्याचे दिसून आले. विशेषत: बारामतीत प्रचार करताना त्यांनी विकासावरच भर दिला. ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्याविषयी ते आदराने बोलत राहिले. कुटुंबातील सदस्यांवरही शेलक्या शब्दांत नाराजी व्यक्त करत राहिले. त्यामुळे त्यांची रागीट ही प्रतिमा प्रचाराच्या काळात बाजूला पडली. शिवाय 'लाडकी बहीण योजने'च्या माध्यमातून त्यांना महिला मतदारांकडूनही प्रतिसाद मिळाला.

जिल्ह्यातील दहा मतदारसंघांपैकी मावळ आणि पुरंदरवगळता बारामती, इंदापूर, भोर, आंबेगाव, शिरूर आणि खेड-आळंदी या मतदारसंघांमध्ये राष्ट्रवादी (अजित पवार) आणि राष्ट्रवादी (शरद पवार) या दोन 'राष्ट्रवादी'मध्ये थेट लढती होत्या. त्यामध्ये एकाही ठिकाणी राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षाला यश मिळाले नाही. मावळमध्ये राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षाने उमेदवार उभा न करता अपक्षाला पाठिंबा दिला होता. मात्र, त्या ठिकाणीही ते अपयशी ठरले.

बारामतीतून अजित पवार, आंबेगावमधून दिलीप वळसे, इंदापूरमध्ये दत्ता भरणे, भोरमध्ये शंकर मांडेकर, शिरूरमध्ये माऊली कटके, मावळमधून सुनील शेळके असे सहा जण जिल्ह्यातून विजयी झाले, तर पुणे शहरात हडपसरमधून चेतन तुपे आणि पिंपरी-चिंचवड शहरातील पिंपरी मतदारसंघातून अण्णा बनसोडे हे दोन्ही आमदार सलग दुसऱ्यांना निवडून आले.



### खेड-आळंदीत पराभव

» राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षाला जिल्ह्यात दोन ठिकाणी पराभव पत्करावा लागला. खेड-आळंदीमध्ये दिलीप मोहिते पराभूत झाले. या ठिकाणी शिवसेना (ठाकरे) पक्षाचे बाबाजी काळे हे विजयी झाले. जुन्नरमध्ये अतुल बेनके हे यशस्वी होऊ शकले नाहीत. या मतदारसंघात मनसेचे माजी आमदार शरद सोनवणे यांनी अपक्ष निवडणूक लढवून ते विजयी झाले.

### मैत्रीपूर्ण लढतीत अपयश

» अजित पवार यांनी पुरंदर मतदारसंघात मैत्रीपूर्ण लढतीचा निर्णय घेतला होता. त्या ठिकाणी शिवसेना (शिंदे) पक्षाचे उमेदवार, माजी राज्यमंत्री विजय शिवतारे यांच्या विरोधात माजी सनदी अधिकारी संभाजी झेंडे यांना उमेदवारी दिली होती. मात्र, या ठिकाणी ते अपयशी ठरले. शिवतारे विजयी झाले, तर झेंडे तिसऱ्या क्रमांकावर राहिले.

---

# दिलजीत दोसांझच्या म्युझिक कॉन्सर्टला स्थानिकांचा विरोध, कोथरूडकर रस्त्यावर

## या कार्यक्रमाच्या विरोधात आंदोलन करण्यासाठी स्थानिक नागरिक रस्त्यावर उतरले आहेत.

**पुणे | प्रतिनिधी**

गायक दिलजीत दोसांझ याच्या कार्यक्रमांस स्थनिक कोथरूडकरांनी विरोध केला आहे. या कार्यक्रमाच्या विरोधात आंदोलन करण्यासाठी स्थानिक नागरिक रस्त्यावर उतरले आहेत.

सुप्रसिद्ध पंजाबी गायक दिलजीत दोसांझ याच्या कार्यक्रमांस स्थनिक कोथरूडकरांनी विरोध केला आहे. या कार्यक्रमाच्या विरोधात आंदोलन करण्यासाठी स्थानिक नागरिक रस्त्यावर उतरले आहेत. यावेळी स्थानिकांनी 'वेळ आहे लढायची आपले कोथरूड वाचवायची' असे फलक लिहून सेव्ह कोथरूडच्या घोषणा दिल्या.

दिलजीत दोसांझ याची रविवारी (२४ नोव्हेंबर) पुण्यात म्युझिक कॉन्सर्ट होणार आहे. पुण्यात काकडे फार्म येथे दिलजीत दोसांझची म्युझिक कॉन्सर्ट होणार आहे. दोसांझ सध्या 'दिल लुमिनाटी' टूरवर आहे. त्याचाच भाग म्हणून रविवारी सायंकाळी त्याचा गाण्यांचा कार्यक्रम पुण्यात होणार आहे. या कार्यक्रमामुळे दोसांझ चर्चेत आला आहे. तरुणाई दोसांझच्या गाण्यांना पसंत करत आहे. मात्र पुणेकरांनी या कार्यक्रमाला विरोध केला आहे.

या कॉन्सर्टला कोथरूडचे नवनियुक्त आमदार तसेच मंत्री चंद्रकांत पाटील यांनी विरोध दर्शवला आहे. फक्त दारू विक्रीसाठी विरोध नाही तर हा कार्यक्रम देखील रद्द करा अशा सुचना चंद्रकांत पाटील यांनी पुणे पोलीस आयुक्त, उत्पादन शुल्क विभाग, आणि जिल्हाधिकारी यांना केल्या आहेत. या कार्यक्रमामुळे वाहतूक कोंडी आणि कर्कश आवाजामुळे स्थानिकांना होणारा त्रास यामुळे हा कार्यक्रम रद्द करण्याची मागणी पाटील यांनी केली आहे. असे कार्यक्रम समाजाला लागलेली किड असून हा कार्यक्रमझाला तर त्या विरोधात मोर्चा काढला जाईल असा इशारा चंद्रकांत पाटील यांनी दिला. तसेच स्थानिकांनी देखील या कार्यक्रमाला विरोध केला आहे. कार्यक्रमाच्या विरोधात आंदोलन करण्यासाठी नागरिक रस्त्यावर उतरले आहेत.




### कार्यक्रम रद्द करा

» चंद्रकांत पाटील म्हणाले, पुण्यात कोथरूड मधील काकडे फार्म येथे होणाऱ्या दिलजीत दोसांझच्या म्युझिक कॉन्सर्टला माझा स्थानिक आमदार म्हणून तसेच पण एक नागरिक म्हणून विरोध आहे. फक्त दारू विक्रीसाठी विरोध नाही तर या कार्यक्रमामुळे होणाऱ्या ट्रॅफिक जाम आणि कर्कश आवाजाला सुद्धा माझा विरोध आहे. हा कार्यक्रम रद्द करा अशा सुचना मी पोलीस आयुक्त, उत्पादन शुल्क विभाग, आणि जिल्हाधिकारी यांना दिल्या आहेत. असे कार्यक्रम समाजाला लागलेली किड आहे. त्यामुळे कोथरूड मध्ये हा कार्यक्रम झाला तर भारतीय जनता पक्षाच्या वतीने मोठा मोर्चा काढण्यात येईल आणि या मोर्चाचे नेतृत्व मी स्वतः करेन.

# जगतापांचा विजयाचा तर कलाटेंचा पराभवाचा चौकार

## राज्यातील सर्वांत मोठ्या चिंचवड विधानसभा मतदारसंघात पुन्हा एकदा जगताप पॅटर्न चालला.

**पिंपरी | प्रतिनिधी**

राज्यातील सर्वांत मोठ्या चिंचवड विधानसभा मतदारसंघात पुन्हा एकदा जगताप पॅटर्न चालला. तब्बल १ लाख ३ हजार ८६५ एवढे मताधिक्य घेत जगताप यांनी राहुल कलाटे यांचा दारुण पराभव केला. या विजयामुळे जगताप कुटुंबातील तिसरा व्यक्ती आमदार म्हणून विधानसभेत पाऊल टाकणार आहे. या निवडणुकीत जगतापांनी विजयाचा चौकार मारला. तर राहुल कलाटे यांना सलग चौथ्यांदा पराभवाचा सामना करावा लागला आहे.



शिरूर लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. अमोल कोल्हे यांच्या आग्रहाखातर राहुल कलाटे यांना राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाकडून पक्षप्रवेश न करता उमेदवारी देण्यात आली. राहुल कलाटे यांच्यासाठी खुद्द शरद पवार यांनी रोड शो केला. जाहीर सभा घेतली. खासदार संजय राऊत, राष्ट्रवादीचे नेते जयंत पाटील यांनीही सभा घेतली. मात्र, या सभांचे मतांमध्ये परिवर्तन झाले नसल्याचे दिसून आले आहे. स्वतःच्या लोकसभा मतदारसंघातील भोसरी विधानसभा मतदारसंघ सोडून खासदार कोल्हे हे चिंचवड विधानसभा मतदारसंघात अधिक लक्ष ठेवून होते. लोकसभेला वापरलेली स्वतःची सर्व यंत्रणा कोल्हे यांनी राहुल कलाटे यांच्यासाठी खर्च केली. मात्र त्याचा काहीच परिणाम झाला नसल्याचे निकालावरून स्पष्ट दिसत आहे.

दुसरीकडे शंकर जगताप यांनी सर्व नाराजांना एकत्र करण्याची मोट बांधली. भाजपमधील अंतर्गत नाराजांना एकत्र करतानाच राष्ट्रवादी अजित पवार गटाचे स्थानिक नेते नाना काटे यांची बंडखोरी देखील क्षमविण्यात जगताप यांना यश आले होते. परिणामी भाजपचे नवनिर्वाचित कार्याध्यक्ष शत्रुघ्न उर्फ बापू काटे आणि नाना काटे यांची ताकद जगतापांच्या पाठीशी उभी राहिली. राष्ट्रवादी अजित पवार गट सोडून ऐन निवडणुकीच्या तोंडावर शिवसेना उद्धव ठाकरे गटात प्रवेश केलेले मोरेश्वर भोंडवे यांनी देखील महाविकास आघाडीचे उमेदवार कलाटे यांच्या ऐवजी जगताप यांना पाठिंबा जाहीर केला. आमदार लक्ष्मण जगताप यांच्या निधनानंतर त्यांच्या पत्नी अश्विनी जगताप या पोटनिवडणूक लढवत आमदार झाल्या. मात्र, या निवडणुकीच्या वेळेस त्यांनी पक्षाला पत्र लिहित शंकर जगताप यांना तिकीट देण्याची विनंती केली. भारतीय जनता पक्षानेही त्यांची विनंती मान्य करत शंकर जगताप यांना उमेदवारी जाहीर केली. तर महाविकास आघाडीकडून निवडणूक जाहीर झाली तरी उमेदवार निश्चित करण्यात आला नव्हता. केवळ खासदार डॉ. अमोल कोल्हे यांच्या आग्रहाखातर कलाटे यांना उमेदवारी देण्यात आली होती.

चिंचवड मतदारसंघाची एकूण मतदार संख्या ६ लाख ६३ हजार ७८८ एवढी आहे. या पैकी ३ लाख ८४ हजार ५६८ मतदारांनी मतदान केले. त्यापैकी ४३१६ मतदारांनी नोटाला पसंती दिली. चिंचवड मतदारसंघासाठी एकूण २३ मतमोजणी फेऱ्या झाल्या. मतमोजणीच्या पहिल्या फेरीपासूनच महायुतीचे शंकर जगताप आघाडीवर होते. टपाली मतदानातही जगताप यांनाच आघाडी मिळाली. अखेरच्या फेरीअखेर २ लाख ३५ हजार ३२३ मते पडली. राहुल कलाटे यांना १ लाख ३१ हजार ४५८ मते मिळाली. तर, अपक्ष उमेदवार भाऊसाहेब भोईर यांना ४ हजार ३२३ मते मिळाली.

### राहुल कलाटे यांचा चौथा पराभव

» राहुल कलाटे यांनी चार वेळा विधानसभा निवडणूक लढवली आहे. आमदार लक्ष्मण जगताप यांच्या विरोधात दोन वेळेस निवडणूक लढवली. त्यांच्या निधनानंतर लागलेली पोटनिवडणूक अश्विनी जगताप यांच्या विरोधात लढवली. तर, आता शंकर जगताप यांच्या विरोधात निवडणूक लढवली. या चारही निवडणुकीत त्यांचा पराभव झाला आहे.

# 'आपली पीएमपीएमएल' ॲपची सेवा विस्कळीत

## बसचे लोकेशन नसल्याने उडतोय गोंधळ, प्रवाशांच्या प्रशासनाकडे अनेक तक्रारी

**पिंपरी | प्रतिनिधी**

प्रवाशांना बसची माहिती व्हावी, बसचे लोकेशन व मार्ग कळवा यासाठी, सुरू करण्यात आलेले 'आपली पीएमपीएमएल' हे ॲप मध्येच बंद पडत आहे. प्रवाशांना बसबद्दलची कोणतीच माहिती मिळत नाही. म्हणूनच या ॲपसेवेबद्दलच्या प्रवाशांच्या तक्रारी वाढत आहेत.




प्रवाशांना बसची माहिती व्हावी, बसचे लोकेशन व मार्ग कळवा यासाठी, सुरू करण्यात आलेले 'आपली पीएमपीएमएल' हे ॲप मध्येच बंद पडत आहे. प्रवाशांना बसबद्दलची कोणतीच माहिती मिळत नाही. म्हणूनच या ॲपसेवेबद्दलच्या प्रवाशांच्या तक्रारी वाढत आहेत. पुणे आणि पिंपरी-चिंचवड पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या (पीएमपीएमएल) बसेस अपडेट बाबत हे ॲप विकसित केले. मात्र त्याचा काडीचाही उपयोग होत नसल्याने नागरिकांकडून संताप व्यक्त केला जात आहे.

शहरासाठी महत्त्वाची सार्वजनिक वाहतूक व्यवस्था म्हणून 'पीएमपी'कडे पाहिले जाते. 'पीएमपी'कडून १६५० ते १७०० बसमार्फत ३७१ मार्गावर सेवा दिली जाते. दिवसाला साधारण दहा ते बारा लाख प्रवासी प्रवास करतात. 'पीएमपी'च्या बसचे 'लाइव्ह लोकेशन' प्रवाशांना दिसावे, ऑनलाइन तिकीट काढता यावे, ऑनलाइन तक्रार करता यावी, म्हणून 'पीएमपीएमएल'ने 'आपली पीएमपीएमएल' हे ॲप विकसित केले आहे. ते १५ ऑगस्टपासून प्रवाशांच्या सेवेत दाखल झाले आहे.

या आठवड्यामध्ये या ॲपच्या तक्रारी नागरिकांकडून वाढले आहेत. बसचा मार्ग दिसत नसल्याचे प्रवासी सांगत आहेत. पीएमपीने प्रवाशांच्या सुविधेकरिता आपली पीएमपीएमएल हे ॲप सुरू केले. परंतु ऑनलाइन तिकिट काढताना येणाऱ्या समस्येपासून ते ॲपची अचानक विस्कळीत होणारी सेवा, असा अनुभव प्रवाशांना मिळत आहे. गेल्या आठवड्यात अचानक ॲपवर प्रवाशांना पीएमपी बसचे लाइव्ह लोकेशन, बसचा क्रमांक, मार्ग दिसेनासा झाला. त्यामुळे नियमित ॲप वापरणाऱ्या प्रवाशांची गैरसोय झाली. अगोदरच निवडणूक कामासाठी ९६८ बस दिल्या होत्या. त्यामुळे मार्गावरील बस कमी झाल्या होत्या. त्यात बसची माहिती मिळत नसल्याने प्रवाशांना मनस्ताप सहन करावा लागला.

### निवडणूकिनंतर आली यात्रा

» निवडणुकीनंतर आता आळंदी यात्रेसाठी बसेस पुरवण्यात येणार आहे. त्यामुळे दोन दिवस पीएमपी सेवेवर अवलंबून असणाऱ्या नागरिकांना खाजगी वाहनाचा वापर करावा लागला होता. आता पुढील आठवड्यात पुन्हा बसेस यात्रेसाठी देण्यात येणार आहेत. त्यामुळे त्यांना पुन्हा इतर वाहतूक सेवा शोधावी लागणार आहे. त्यातच नव्या बस दाखल न झाल्याने जुन्या बसेस वारंवार बंद पडत आहेत.

# मतदान होताच सर्वसामान्यांचा खिसा कापला

## आंतरराष्ट्रीय बाजारात किंमती वाढल्याचे कारण देत सीएनजीच्या दरात प्रतिकिलो दोन रुपये वाढ, पुणेकर नाराज

**पुणे | प्रतिनिधी**

राज्यात विधानसभा निवडणुकीसाठी मतदान प्रक्रिया पार पडली. प्रचारादरम्यान मोठमोठ्या आश्वासनांच्या वाफा सोडण्यात आल्या. महागाई हटवण्याचे आश्वासन देण्यात आले. प्रत्यक्षात मतदान प्रक्रिया संपल्यानंतर तत्काळ आंतरराष्ट्रीय बाजारात किंमतीत वाढ होत असल्याचे कारण देत सीएनजीच्या दरात स्थानिक पातळीवर प्रतिकिलो दोन रुपये वाढ करण्यात आली. या दरवाढीमुळे सर्वसामान्यांच्या खिशाला झळ बसणार आहे. पेट्रोल आणि डिझेलच्या वाढत्या किंमती वाढत असल्याने सीएनजीला पसंती देणाऱ्या पुणेकरांनी या निर्णयावर नाराजी व्यक्त केली आहे.

सीएनजी दर आता प्रतिकिलो ८७.९० रुपयांवर पोहोचला आहे. पाईप्ड नॅचरल गॅसच्या (पीएनजी) दरात कोणताही बदल करण्यात आलेला नाही. पुणे, पिंपरी-चिंचवडमध्ये सीएनजी दरवाढीचा दणका बसला आहे. सीएनजीचा दर आता प्रतिकिलो ८७.९० रुपये झाला असला तरी त्यातून पुण्यातील मोटारचालकांची पेट्रोलच्या तुलनेत ४९ टक्के आणि डिझेलच्या तुलनेत २७ टक्के बचत होत असून रिक्षाचालकांची २९ टक्के बचत होत आहे, असे कंपनीने सप्टेंबरमधील दरवाढीवेळी म्हटले होते. यावर्षी जुलै महिन्यातही सीएनजीचे दर वाढले होते.

सध्या इंधनाचे दर वाढले असून पेट्रोल आणि डिझेल महागल्याने वाहनचालक पर्यावरणपूरक सीएनजीला पसंती देत आहेत. मात्र, आता सीएनजीचे दरही वाढू लागले आहेत. पुण्यात जुलैमध्ये सीएनजीच्या दरात प्रतिकिलो दीड रुपयांची वाढ झाली होती. त्यामुळे सीएनजीचा दर त्यावेळी प्रतिकिलो ८५ रुपयांवर पोहोचला होता. सीएनजीच्या दरात सातत्याने वाढ होत असल्याने वाहनाचालकांच्या खिशाला झळ बसत आहे.




### प्रवाशांना भुर्दंड सहन करावा लागणार

» सार्वजनिक वाहतूकीत ऑटोरिक्षा आणि कार सीएनजीवर आहेत. सीएनजी वाढल्याने सीएनजी वाहनचालकांच्या खिशाला थेट फटका बसणार असून या भुर्दंड प्रवाशांना सहन करावा लागणार आहे. ऑटोरिक्षा आणि टॅक्सीचालकांच्या संचालन खर्चात वाढ झाल्याने भाडे वाढण्याची शक्यता आहे. आधीच वाढत्या महागाईचा सामना करणाऱ्या सर्वसामान्य ग्राहक आणि व्यावसायिकांसमोर ही वाढ आणखी एक आव्हान म्हणून समोर आली आहे.

### सरकारच्या निर्णयानंतर भाववाढ

» सरकारने शहर गॅस वितरण कंपन्यांसाठी प्रशासकीय किंमत यंत्रणा गॅस वाटप २० टक्क्यांनी कमी केले आहे. सलग दुसऱ्या महिन्यात ही कपात करण्यात आली आहे. या पावलामुळे एमजीएल आणि आयजीएलसारख्या कंपन्यांच्या नफ्यावर परिणाम होईल, असे तज्ज्ञांचे मत आहे.

### भविष्यात सीएनजीची किंमत आणखी वाढणार

» सध्या सीएनजीच्या किमतीत दोन रुपयांची वाढ सुमारे २.६ टक्के इतकी आहे. तज्ज्ञांच्या मते, एपीएम गॅस वाटपातील कमतरता भरून काढण्यासाठी सीएनजीच्या किमती ८-१० टक्के वाढवाव्या लागतील. लवकरच इंद्रप्रस्थ गॅस लिमिटेडदेखील किमती वाढवण्याची शक्यता आहे.

# पुणे जिल्ह्यातील 303 उमेदवारांना 47 हजार मतदारांनी नाकारले

## पुणे शहरासह जिल्ह्यातील 21 विधानसभा मतदारसंघामधून 303 उमेदवारांनी निवडणुकीच्या माध्यमातून जनमताचा कौल


**पुणे | प्रतिनिधी**

पुणे शहरासह जिल्ह्यातील २१ विधानसभा मतदारसंघामधून ३०३ उमेदवारांनी निवडणुकीच्या माध्यमातून जनमताचा कौल आजमावला. मात्र, ४७ हजार ६८५ मतदारांनी सर्वच उमेदवारांना नाकारले असल्याचे मतमोजणीमध्ये स्पष्ट झाले आहे. विशेष म्हणजे, वडगाव शेरी मतदारसंघात राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षाचे उमेदवार सुनील टिंगरे यांच्या पराभवाची मते 'नोटा'इतकी असल्याचे दिसून आले आहे.

पुणे शहरात आठ, पिंपरी चिंचवडमध्ये तीन आणि उर्वरीत ग्रामीण भागात दहा असे एकूण २१ विधानसभा मतदारसंघ आहेत. या मतदारसंघातून महायुती, महाविकास आघाडीतील प्रमुख पक्षांसोबत वंचित बहुजन आघाडी, महाराष्ट्र नवनिर्माण सेना, बहूजन समाज पक्ष आणि इतर प्रादेशिक, स्थानिक पक्ष आणि अपक्ष असे ३०३ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात होते.

चिंचवड मतदारसंघातून सर्वाधिक २१ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात होते, त्याच मतदारसंघात सर्वाधिक चार हजार ३१६ मतदारांनी 'वरीलपैकी कोणीही नाही' (नोटा) पर्याय निवडला आहे. त्यापाठोपाठ शहरातील वडगाव शेरी मतदारसंघात सर्वाधिक चार हजार २३७ मतदारांनी नोटा पर्याय निवडला आहे. या मतदारसंघातील राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षाचे टिंगरे अवघ्या चार हजार ७१० मतांनी पराभूत झाले आहे. तिसऱ्या क्रमांकावर कोथरूड मतदारसंघातून तीन हजार मतदारांनी 'नोटा'ला मतदान केल्याचे मतमोजणीनंतर समोर आले आहे. कोथरूडमधून राज्याचे उच्च तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील निवडणुकीच्या रिंगणात होते. शिवाजीनगरमधून भाजपचे विद्यमान आमदार सिद्धार्थ शिरोळे यांच्यासह १२ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात होते. शिवाजीनगर मतदारसंघातून दोन हजार मतदरांनी एकही उमेदवार पसंत नसल्याने 'नोटा'ला मतदान केले आहे.

ग्रामीण भागातील जुन्नर विधानसभा मतदारसंघात १३७६ मतदारांनी 'नोटा' पर्यायावर विश्वास दाखविला. आंबेगाव ११५७, खेड-आळंदी १६९२, शिरूर २१५७, दौंड १२११, इंदापूर ६३४, बारामती ७७९, पुरंदर १४८४, भोर २७२० आणि मावळ विधानसभा मतदारसंघात २७१५ मतदारांनी 'नोटा'ला मतदान केल्याचे जिल्हा निवडणूक प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले.




### मैत्रीपूर्ण लढतीत अपयश

» जुन्नर – १३७६, आंबेगाव – ११५७, खेड आळंदी – १६९२, शिरूर – २१५७, दौंड – १२११इंदापूर – ६३४, बारामती – ७७९, पुरंदर – १४८४, भोर -२७२०, मावळ – २७१५, चिंचवड – ४३१६, पिंपरी – ४०१३, भोसरी – २६८५, वडगाव शेरी – ४२३७, शिवाजीनगर – २०४४, कोथरूड – ३१५२, खडकवासला – २९००, पर्वती – २४६१, हडपसर – २९४६, पुणे कॅन्टोन्मेंट – १७९३, कसबा – १२१३